Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)
Vol - VI Issue - I JANUARY 2019 Peer Review e-Journal Impact Factor 5.707 ISSN 2349-638x

# भंडारा जिल्हाच्या साकोली तहसिलमधील प्राथमिक स्तरावरील शिक्षणसंस्थाचे कालीक व अभिक्षेत्रीय स्वरूप (२००१-२०१०)

रजनी रूषीजी गायधने
डॉ. दिगंबर ए.पारधी
नेवजाबाई हितकारणी महाविद्यालय, ब्रम्हपूरी, जि. चंद्रपूर

१.० प्रस्तावना

मनुष्याला जीवनात अनेक अनुभव येत असतात, आपल्या ज्ञानेंद्रियांच्या मदतीने मनुष्य अनुभव घेत असतो व आपल्या कर्मेंद्रियांद्वारे कार्य करीत असतो, किंवा आपल्या अनुभवानुसार स्वत:च्या वर्तनात बदल, किंवा त्यात सुधारणा करीत असतो याच निरंतर परिवर्तनाला मनुष्याचा विकास म्हणता येईल व विकास म्हणजेच 'शिक्षण' असा याचा अर्थ घेता येईल. 'मनुष्य म्हणजे विचार करणारा प्राणी' अशी मनुष्याची व्याख्या केली आहे. मनुष्य म्हणजे शिक्षण घेणारा प्राणी असेही म्हणता येईल. शिक्षण क्षमतेमुळेच मनुष्य इतर प्राण्यांपेक्षा अधिक विकासक्षम ठरला आहे, कर्तृत्ववान ठरला आहे. भौतिक परिस्थितीशी केवळ जुळवून घेण्याने त्याचे समाधान होत नाही, तर आपल्या सोयीनुसार परिस्थितीमध्ये परिवर्तन करण्यासाठी तो सतत प्रयत्नशील असतो व याकरीता तो शैक्षणिक संस्थांची निर्मिती करतो.

परंतु, शैक्षणिक संस्था विशिष्ठ ठिकाणी स्थापन करण्यापूर्वी खाजगी संस्था व वैयक्तीक संस्था आर्थीकदृष्टया फायदेशीर होतील का अथवा कमीतकमीत स्वयंपूर्ण होतील का याचाच प्रामूख्याने विचार करतात. व याकरीता अनेकवेळा त्यांना शासकीय अनूदान घ्यावे लागते. अऱ्याचवेळा शासनाव्दारे अशाप्रकारे आर्थीक परिस्थीतीनूसार विचार न करता आवश्यकतेनूसार विचार करण्यात येऊन अशा संस्था निर्माण केल्या जातात. अशा फरकामूळे शासकीय संस्थाचे वितरण यात फरक पडतो. म्हणजे एकूणच शैक्षणिक संस्था या लोकांची शैक्षणिक गरज भागविण्यासाठी कार्य करीत असतात. त्यामुळे साकोली तालूक्यातील अशा शैक्षणिक संस्थाचे वितरण कशाप्रकारे आहे व लोकांची गरज भागविण्याच्या दृष्टीने तेथील संस्थेत शैक्षणिक सूविधा पूरेशा आहेत का? संस्था योग्य जागी स्थापन झाल्या का ? याचा अभ्यास या संशोधनकार्यात करण्यात आला आहे.

२.० अध्ययन क्षेत्राची माहिती - साकोली तहसिल

तहसिलचे एकूण भौगिलिक क्षेत्रफळ २३७३.७५ वर्ग कि.मी. असून त्यापैकी काही जमीन पडीत क्षेत्र, काही कृषी उपज जमीन तर काही क्षेत्र राखीव जंगलाचे आहे. सन २००१ नूसार तहसिलची एकूण लोकसंख्या १ लाख ३६ हजार एवढी असून पुरूषांची ६९ हजार तर स्त्रिया ६७ हजार आहे. या लोकसंख्येत स्त्री पूरूषांचे प्रमाण अनूकमे (५० टक्के व ४९ टक्के) साधारण सारखे आहे. सन २०११.१२ मध्ये तहसिलची लोकसंख्या १,६३,१४९ एवढी असून ८२५९४ पूरूष तर ८०५४४ स्त्रीया आहे. म्हणजेच सन २००१ ते २०१० या दहा वर्षात लोकसंख्या २७००० ने वाढली आहे. म्हणजेच तालूक्याची लोकसंख्या ३० टक्के ने वाढली दिसून येते. या काळात पूरूषांची लोकसंख्या १६ टक्के वाढली तर स्त्रियांची लोकसंख्या सूध्दा १६ टक्के ने वाढली असे दिसून येते. २०११ च्या जनगणनेनूसार तालूक्यात लोकसंख्येची घनता १२१ इतकी आहे.

३.० संशोधन पद्धती

संशोधन कार्यासाठी निर्दोष माहिती मिळण्यासाठी व संशोधनाची उद्देशपूर्ती होण्यासाठी सर्वेक्षण व विश्लेषण पद्धतीचा उपयोग करण्यात आला. प्रस्तुत संशोधन करण्यासाठी संशोधन क्षेत्र म्हणून अध्ययनकर्तीने विदर्भाच्या भंडारा जिल्ह्यातील साकोली तालूक्याची निवड केली.

३.१ अध्ययन विश्व :

प्रस्तूत अध्ययनात साकोली तालूक्याची प्राथमिक स्तरावरील सर्व शैक्षणिक संस्थांचा अध्ययन विश्व म्हणून विचार करण्यात आला.

३.२ संशोधन आराखडा

प्रस्तुत संशोधनात वर्णनात्मक संशोधन आराखड्याची निवड करण्यात आली आहे.

<u>तथ्य संकलन</u>

तथ्य संकननाकरीता सर्वेक्षण पद्धतीचा वापर करण्यात आला. तो याकरीता कारण या पद्धतीमुळे विशिष्ट क्षेत्रातील वर्तमान स्थितीचे यथार्थ चित्र कळते. कोणकोणत्या बाबी कोणत्या स्थितीत उपलब्ध आहेत, याची माहिती मिळते. समस्या निराकरणाकरीता कोणती स्थिती अपेक्षित आहे हे अन्य सर्वेक्षणाच्या आधारे कळते व ही अपेक्षित स्थिती प्राप्त करून समस्येची उकल करण्याकरीता कोणत्या साधनांची व प्रयत्नांची आवश्यकता आहे याची माहिती प्राप्त होते.

३.३ सांख्यिकिय विश्लेषण

प्रस्तुत संशोधनकार्यात प्राप्त झालेल्या माहितीचे संकलन करून आलेख, विवेचन व पृथ:करण व सांख्यकीय विश्लेषण करण्यात आले. प्राप्त माहितीवरुन वारंवारिता (थ्तमुनमदबल) व बहुलक (डवकम) काढण्यात आले. वरील सर्व प्रक्रियेनंतर निष्कर्ष जास्तीत जास्त वस्तुनिष्ठ कसे राहतील यांची दखल घेतल्या गेली व योग्य त्या तक्त्याचा वापर करून सर्व परिणाम प्रस्तुत करण्यात आले.

४.० शैक्षणिक संस्थेबाबत माहितीचे संकलन

४.१ अध्ययन क्षेत्रातील शैक्षणिक संस्था

सारणी क्र. १: भंडारा जिल्ह्याच्या साकोली तहसिलमधील शिक्षणसंस्थांची संख्या (अध्ययन कालावधी वर्ष २०१०-२०११)

| अध्यापक विद्यालय | वरीष्ठ महाविद्यालय | कनिष्ठ महाविद्यालय | औद्योगिक प्र.केंद्र | तंत्रनिकेतन प्र.केंद्र | मा. शाळा ८ ते१० | प्रा. शाळा १ते ४ | उच्च प्रा. शाळा ५ते ६ | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०४ | ०५ | १८ | ०१ | ०१ | १८ | ८६ | ३३ | १६६ |

वरील सारणी क्र. १ मध्ये भंडारा जिल्ह्याच्या साकोली तहसिलमधील एकूण १६६ प्रकारच्या शिक्षणसंस्थामध्ये सर्वसमावेशक अशा बहुतांश प्राथमिक शाळा आढळतात त्यामध्ये, प्राथमिक शाळा १ ते ४ (८६), उच्च प्राथमिक शाळा ५ ते ६ (३३), मा. शाळा ८ ते १० (१८), कनिष्ठ महाविद्यालय (१८), वरीष्ठ महाविद्यालय (०५), अध्यापक विद्यालय (०४), औद्योगिक प्रशिक्षण केंद्र (०१) व तंत्रनिकेतन प्रशिक्षण केंद्र होते.

४.२ साकोली तहसिलमधील साक्षरतेचे प्रमाण

सारणी क्र. २: भंडारा जिल्ह्याच्या साकोली तहसिलमधील साक्षरतेचे प्रमाण दर्शविणारी साारणी

| वर्ष | एकूण | पुरूष | स्त्रिया |
|---|---|---|---|
| २००१-०२ | ७८.९३ | ९०.४१ | ६७.२६ |
| २०११-१२ | ८२.५० | ९१.०० | ७३.८० |

आधार - जनगणना २००१ व २०११

वरील सारणी क्र. २ मध्ये भंडारा जिल्ह्याच्या साकोली तहसिलमधील वर्ष २००१ ते २०१३ या काळातील साक्षरतेचे प्रमाण दर्शविण्यात आले आहे. सारणीत दर्शविलेल्या माहितीनुसार २००१-२००२ या काळात साकोली तहसिलमधील साक्षरतेचे प्रमाण ७८.९३ टक्के असून त्यामध्ये ९०.४१ टक्के पुरूष व ६७.२६ टक्के स्त्रियांचा समावेश होता. त्याचप्रमाणे, वर्ष २०११-१२ या काळात साकोली तहसिलमधील साक्षरतेचे प्रमाण ८२.५ टक्के असून त्यामध्ये ९१.० टक्के पुरूष व ७३.८ टक्के स्त्रियांचा समावेश होता.

४.३ प्राथमिक शासकीय शाळांबाबतची माहिती

सारणी क्र. ३: भंडारा जिल्ह्याच्या साकोली तहसिलमधील प्राथमिक शासकीय शाळांबाबतची माहिती

| वर्ष | संख्या | शिक्षकांची संख्या | विद्यार्थ्यांची संख्या | | स्वच्छता गृहांची सुविधा असलेल्या शाळा |
|---|---|---|---|---|---|
| | | | मुले | मुली | |
| २०१०-११ | १ | ५ | ३५ | २४ | ० |
| २०११-१२ | १ | ७ | ४१ | २९ | १ |

आधार: शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे

वरील सारणी क्र. ३ मध्ये भंडारा जिल्ह्याच्या साकोली तहसिलमध्ये वर्ष २००१ ते २०१२ या काळात उपलब्ध प्राथमिक शासकीय शाळांबाबत माहिती दर्शविण्यात आली आहे. सारणीत दर्शविलेल्या माहितीनुसार २०११-२०१२ या काळात साकोली तहसिलमध्ये १ शासकीय शाळा उपलब्ध असून त्यामध्ये ७ शिक्षकांची नियुक्ती करण्यात आली असल्याचे आढळले. तसेच या शाळेत एकूण ४१ मुले व २९ मुली शिकत असून या शाळेत १ स्वच्छता गृह असल्याचे आढळले.

४.४ प्राथमिक स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांबाबतची माहिती

सारणी क्र. ४: भंडारा जिल्ह्याच्या साकोली तहसिलमधील प्राथमिक स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांबाबतची माहिती

| वर्ष | संख्या | शिक्षकांची संख्या | विद्यार्थ्यांची संख्या | | स्वच्छता गृहांची सुविधा असलेल्या शाळा |
|---|---|---|---|---|---|
| | | | मुले | मुली | |
| २००१-०२ | | | | | |
| २००२-०३ | | | | | |
| २००३-०४ | | | | | |
| २००४-०५ | ८३ | १४० | ११२२ | १२२१ | ७० |
| २००५-०६ | ८३ | १५७ | १५४६ | १८०३ | ७९ |
| २००६-०७ | ८३ | २०० | २१२५ | २५२३ | ८२ |
| २००७-०८ | ८४ | २५७ | २९०० | ३०१४ | ८४ |
| २००८-०९ | ८४ | ३०४ | ३२५१ | ३८६० | ८४ |
| २००९-१० | ९१ | ३३५ | ४३३८ | ४३२९ | ९१ |
| २०१०-११ | ९६ | ३३२ | ४२११ | ४१४५ | ९६ |
| २०११-१२ | ९६ | ३५६ | ४००७ | ४९७२ | ९६ |

आधार: शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे

वरील सारणी क्र. ४. मध्ये भंडारा जिल्ह्याच्या साकोली तहसिलमधील वर्ष २००१ ते २०१२ या काळात उपलब्ध प्राथमिक स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांबाबत माहिती दर्शविण्यात आली आहे. सारणीत दर्शविलेल्या माहितीनुसार

२००४-२००५ या काळात साकोली तहसिलमध्ये ८३ प्राथमिक स्थानिक स्वराज्य संस्थेच्या शाळा उपलब्ध असून त्यामध्ये १४० शिक्षकांची नियुक्ती करण्यात आली असल्याचे आढळले. या शाळांमध्ये एकूण ११२२ मुले व १२२१ मुली शिकत असून फक्त ७० शाळांमध्ये स्वच्छता गृहाची उपलब्धता असल्याचे आढळले. त्याचप्रमाणे २०११-१२ या काळात साकोली तहसिलमध्ये एकूण ९६ प्राथमिक स्थानिक स्वराज्य संस्थेच्या शाळा उपलब्ध शाळा असून त्यामध्ये ३५६ शिक्षकांची नियुक्ती करण्यात आली. या सर्व शाळांमध्ये स्वच्छता गृहाची उपलब्धता असून या शाळांमध्ये एकूण ४००७ मुले व ४९७२ मुली शिकत असल्याचे निदर्शनास आले.

४.५ प्राथमिक शैक्षणिक संस्थेतील शिक्षक

सारणी क्र. ५: भंडारा जिल्ह्याच्या साकोली तहसिलमधील प्राथमिक शाळेत नियुक्त शिक्षकांची संख्या दर्शविणारी सारणी

| वर्ष | शासकीय | स्थानिक संस्था | खाजगी | |
|---|---|---|---|---|
| | | | अनुदानित | विना अनुदानित |
| २००१-०२ | | | | |
| २००२-०३ | | | | |
| २००३-०४ | | | | |
| २००४-०५ | ० | २९३ | ८० | ७ |
| २००५-०६ | ० | ३०९ | ८२ | ११ |
| २००६-०७ | ० | ३११ | ८३ | २३ |
| २००७-०८ | ० | ३१५ | ८३ | २९ |
| २००८-०९ | ० | ३१९ | ८५ | ३२ |

आधार: शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे

वरील सारणी क्र. ४.५ मध्ये भंडारा जिल्ह्याच्या साकोली तहसिलमधील वर्ष २००१ ते २००९ या काळात प्राथमिक शाळांमध्ये नियुक्त केलेल्या शिक्षकांची संख्या दर्शविण्यात आली आहे. सारणीत दर्शविलेल्या माहितीनुसार २००४-२००५ या काळात साकोली तहसिलमधील प्राथमिक स्थानिक संस्थेच्या शाळांमध्ये २९३ शिक्षकांची नियुक्ती करण्यात आली असून खाजगी अनुदानित शाळेत ८० व खाजगी विनाअनुदानित शाळेत ७ शिक्षकांची नियुक्ती करण्यात आली असल्याचे आढळले. तसेच २००८-२००९ या काळात साकोली तहसिलमधील प्राथमिक स्थानिक संस्थेच्या शाळांमध्ये ३१९ शिक्षकांची नियुक्ती करण्यात आली असून खाजगी अनुदानित शाळेत ८५ व खाजगी विनाअनुदानित शाळेत ३२ शिक्षकांची नियुक्ती करण्यात आली असल्याचे आढळले.

४.६ ४थ्या वर्गात विद्यार्थ्यांच्या गळतीचे प्रमाण

सारणी क्र. ६: भंडारा जिल्ह्याच्या साकोली तहसिलमधील ४ थ्या वर्गात विद्यार्थ्यांच्या गळतीचे प्रमाण दर्शविणारी सारणी

| वर्ष | मुले | मुली |
|---|---|---|
| २००१-०२ | | |
| २००२-०३ | | |
| २००३-०४ | | |
| २००४-०५ | २३.४ | १९.२ |
| २००५-०६ | १८.३ | १४.८ |
| २००६-०७ | १६.३ | १०.९ |
| २००७-०८ | १४.१ | ८.१ |
| २००८-०९ | १०.६ | ५.४ |
| २००९-१० | ८.१ | २.८२ |
| २०१०-११ | ३.७ | ३.४ |

आधार - १) शिक्षणाधिकारी (प्राथ/माध्य) जि.प. भंडारा २) सहसंचालक (उच्च शिक्षण), नागपूर

वरील सारणी क्र. ६ मध्ये भंडारा जिल्ह्याच्या साकोली तहसिलमधील वर्ष २००१ ते २०११ या काळातील ४ थ्या वर्गात विद्यार्थ्यांच्या गळतीचे प्रमाण दर्शवितण्यात आले आहे. सारणीत दर्शविलेल्या माहितीनुसार २००४-२००५ या काळात साकोली तहसिलमध्ये प्राथमिक शाळेतील ४ थ्या वर्गात २३.४ टक्के मुलांची गळती झाली असून ४ थ्या वर्गातील मुलींचे गळतीचे प्रमाण १९.२ टक्के असल्याचे आढळले. तसेच २०१०-२०११ या काळात साकोली तहसिलमध्ये प्राथमिक शाळेतील ४ थ्या वर्गात ३.७ टक्के मुलांची गळती झाली असून ४ थ्या वर्गातील

मुलींचे गळतीचे प्रमाण ३.४ टक्के असल्याचे आढळले.

४.७ ७ व्या वर्गात विद्यार्थ्यांच्या गळतीचे प्रमाण

सारणी क्र. ७: भंडारा जिल्ह्याच्या साकोली तहसिलमधील ७ व्या वर्गात विद्यार्थ्यांच्या गळतीचे प्रमाण दर्शविणारी सारणी

| वर्ष | मुले | मुली |
|---|---|---|
| २००१-०२ | | |
| २००२-०३ | | |
| २००३-०४ | | |
| २००४-०५ | ० | ० |
| २००५-०६ | ० | ० |
| २००६-०७ | १५.४ | १४.४ |
| २००७-०८ | ११.३ | १२.९ |
| २००८-०९ | ९.४ | १२.१ |
| २००९-१० | ८.१४ | ११.७९ |

आधार - १) शिक्षणाधिकारी (प्राथ/माध्य) जि.प. भंडारा २) सहसंचालक (उच्च शिक्षण), नागपूर

वरील सारणी क्र. ७ मध्ये भंडारा जिल्ह्याच्या साकोली तहसिलमधील वर्ष २००१ ते २०१० या काळातील ७ व्या वर्गात विद्यार्थ्यांच्या गळतीचे प्रमाण दर्शविण्यात आले आहे. सारणीत दर्शविलेल्या माहितीनुसार २००६-२००७ या काळात साकोली तहसिलमध्ये माध्यमिक शाळेतील ७ व्या वर्गातील १५.४ टक्के मुलांची गळती झाली असून ७ व्या वर्गातील मुलींचे गळतीचे प्रमाण १४.४ टक्के असल्याचे आढळले. तसेच २००९-२०१० या काळात साकोली तहसिलमध्ये माध्यमिक शाळेतील ७ व्या वर्गातील ८.१४ टक्के मुलांची गळती झाली असून ७ व्या वर्गातील मुलींचे गळतीचे प्रमाण ११.७९ टक्के असल्याचे आढळले.

५.० निष्कर्ष

५.१ साकोली तहसिलमधील शिक्षणसंस्थांची संख्या वर्ष २०१०-२०११

- साकोली तालूक्यातील एकूण १३२ शिक्षणसंस्थामध्ये बहुतांश प्राथमिक शाळा आहेत, त्यानंतर उच्च प्राथमिक शाळा व माध्यमिक शाळा आहेत. महाविद्यालये, औद्योगिक व तंत्रनिकेतन प्रशिक्षण केंद्र यांची संख्या सार्थक प्रमाणावर कमी असल्याचे आढळले.

५.२ साकोली तालुक्यातील साक्षरतेचे प्रमाण

- संशोधन कालावधीत भंडारा जिल्ह्याच्या साकोली तालुक्यातील साक्षरतेचे प्रमाण ७८.९३ प्रतिशत पासुन ८२.५० प्रतिशत पर्यंत वाढले आहे. एकंदरीत, पुरूषांच्या तुलनेत स्त्रियांमध्ये साक्षरतेचे प्रमाण कमी आहे.

५.३ साकोली तालुक्यातील प्राथमिक शासकीय शाळा

- संशोधन कालावधीत भंडारा जिल्ह्याच्या साकोली तालुक्यातील प्राथमिक स्तरावरील शासकीय शाळांच्या संख्येत व तेथील शिक्षकांच्या संख्येत ही वाढ झाली असून या शाळांमध्ये स्वच्छता गृहाचे ही निर्माण झाले. एकंदरीत, विद्यार्थ्यांच्या तुलनेत विद्यार्थीनींचे प्रमाण कमी आहे.

५.४ साकोली तालुक्यातील प्राथमिक स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळा

- संशोधन कालावधीत भंडारा जिल्ह्याच्या साकोली तालुक्यातील प्राथमिक स्तरावरील स्थानिक स्वराज्य शाळांच्या संख्येत व तेथील शिक्षकांच्या संख्येत ही वाढ झाली असून या शाळांमध्ये स्वच्छता गृहाची ही उपलब्ध झाली. एकंदरीत, विद्यार्थ्यांच्या तुलनेत विद्यार्थीनींचे प्रमाण जास्त आहे.

५.५ साकोली तालुक्यातील प्राथमिक शैक्षणिक संस्थेतील शिक्षक

- संशोधन कालावधीत भंडारा जिल्ह्याच्या साकोली तालुक्यातील सर्व प्रकारच्या प्राथमिक शैक्षणिक शाळांमधील शिक्षकांच्या संख्येत वृद्धि झाली. एकंदरीत, स्थानिक

संस्थेतील शिक्षकांच्या तुलनेत इतर प्राथमिक शाळेतील शिक्षकांचे प्रमाण कमी आहे.

५.६ साकोली तालुक्यातील ४ थ्या वर्गात विद्यार्थ्यांच्या गळतीचे प्रमाण

- संशोधन कालावधीत भंडारा जिल्ह्याच्या साकोली तालुक्यातील ४ थ्या वर्गातील गळतीच्या प्रमाणात घट झाली आहे. एकंदरीत, विद्यार्थीनींच्या तुलनेत विद्यार्थ्यांच्या गळतीमध्ये जास्त घट झाली आहे.

५.७ साकोली तालुक्यातील ७ व्या वर्गात विद्यार्थ्यांच्या गळतीचे प्रमाण

- संशोधन कालावधीत भंडारा जिल्ह्याच्या साकोली तालुक्यातील ७ व्या वर्गातील गळतीच्या प्रमाणात घट झाली आहे. एकंदरीत, विद्यार्थीनींच्या तुलनेत विद्यार्थ्यांच्या गळतीमध्ये जास्त घट झाली आहे.

६.० आधारग्रंथ सुची

1. दिक्षीत पु.म., श्री. गुर्जर मा.ध., 'चतुर्थवृत्तीची प्रस्तावना' आयुविद्या मुद्रणालय, जून १९६४, पृ.क्र. १
2. कुंडले म.बा., कुळकर्णी दामोदर दिनकर, 'शैक्षणिक तत्वज्ञान व शैक्षणिक मानसशास्त्र' प्रकाशक - महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथनिर्मिती मंडळासाठी, श्री विद्या प्रकाशन २५०, शनिवार पेठ, अष्टपूजा रस्ता पुणे ३०, पृ.क्र. २८-२९.
3. घाटोळे रा.ना. समाज शास्त्रीय संशोधन तत्वे आणि पध्दती श्री मंगेश प्रकाशन रामदासपेठ नागपूर १० चतुर्थ आवृत्ती १९९०.
4. बोधनकर सु., अलोनी वि., सामाजिक संशोधन पद्धती, श्री. साईनाथ प्रकाशन, नागपूर, २००३:१४७.
5. बोरूडे, रा. र., संशोधन पध्दतीशास्त्र, प्रकाशक-महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ नागपूर, तिसरी आवृत्ती १९८७.
6. कायंदे पाटील गं. वि., संशोधन पद्धती चैतन्य पब्लिकेशन्स, नाशिक-१३, जून, २००६
7. कऱ्हाडे बी. एम - 'शास्त्रीय संशोधन पद्धती' पिंपळापूरे प्रकाशन, नागपूर - २००८